भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०१२-१३/४४ जुलै २, २०१२

डीबीओडी.एएमएल.बीसी.क्र. १२/१४.०८.००१/२०१२-१३ आषाढ ११, १९३४ (शक).

अध्यक्ष/मुख्य कार्यकारी अधिकारी - सर्व अनुसूचित वाणिज्य बँका (आरआरबी सोडून).

महोदय,

**बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ३६(१)(अ) खाली दिलेली मार्गदर्शक तत्वे फॉरिन कॉंट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, २०१० च्या तरतुदींची अंमलबजावणी**

कृपया आमचे महापरिपत्रक, डीबीओडी.एएमएल.बीसी.क्र.१/१४.०८.००१/२०१०-११ दि. जुलै १, २०१० चा संदर्भ घ्यावा. त्यात, आम्ही, फॉरिन कॉंट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, १९७६ - भारतामधील संघ/संस्था ह्यांच्याद्वारे विदेशी सहाय्य/वर्गणी मिळविण्याबाबतच्या विनियमांबाबत बँकांच्या जबाबदा-या ह्यावरील सूचना/मार्गदर्शक तत्वे बँकांना पाठविली होती.

(२) विदेशी सहाय्य (विनियम) अधिनियम २०१० व विदेशी सहाय्य (विनियम) नियम, २०११ जारी झाल्याने विदेशी सहाय्य (विनियम) अधिनियम, १९७६ रद्दबातल झाला आहे.

(३) ह्या महापरिपत्रकात, रिझर्व बँकेने, विदेशी सहाय्य (विनियम) अधिनियम, २०१० व विदेशी सहाय्य (विनियम) नियम २०११ वरील, जून ३०, २०१२ पर्यंत रिझर्व बँकेने दिलेली मार्गदर्शने एकत्रित करण्यात आली आहेत.

(४) हे महापरिपत्रक, रिझर्व बँकेच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in) टाकण्यात आले आहे.

आपली,

(सुधा दामोदर)

मुख्य महाव्यवस्थापक.

फॉरिन कॉंट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, २०१० च्या तरतुदींची अंमलबजावणी या वरील महापरिपत्रक


| | |
|---|---|
| १ | सर्वसाधारण |
| २ | मार्गदर्शक तत्वे |
| ३ | एफसीआरए, २०१० चे महत्वाचे गुणविशेष |
| ३.१ | प्रस्तावना |
| ३.२ | विदेशी सहाय्य स्वीकारण्यावरील मनाई |
| ३.३ | विदेशी आदरातिथ्य स्वीकारण्यावरील निर्बंध |
| ३.५ | विदेशी कॉंट्रिब्युशन स्वीकारण्यासाठी नोंदणी |
| ३.६ | विदेशी सहाय्याचा स्वीकार, हस्तांतरण व उपयोग इत्यादींवरील मनाई व निर्बंध |
| ३.७ | अनुसूचित बँकेमार्फत मिळविले जाणारे विदेशी कॉंट्रिब्युशन |
| ३.८ | लेखा ठेवणे व ॲसेट्सची वासलात |
| ३.९ | तपासणी व जप्त करण्याचे अधिकार |
| ३.१० | संकीर्ण प्रश्न |
| ४ | ह्या अधिनियमाखाली केलेले नियम व बँकांद्वारे अहवाल पाठविणे जाणे |

## (१) सर्वसाधारण

(१.१) भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने, अधिकृत राजपत्रात, अधिसूचना एस.ओ ९०९ (ई) दि. २९ एप्रिल २०११ प्रसिध्द केली असून त्या अन्वये, मे १, २०११ पासून विदेशी सहाय्य (विनियम) अधिनियम, २०११ (हा अधिनियम) जारी करण्यात आला आहे. ह्या अधिनियमाचा कलम ४८ खाली, राजपत्रित अधिसूचना जीएसआर, ३४९ (ई) दि. २९ एप्रिल २०११ द्वारा अधिसूचित विदेशी सहाय्य (विनियम) नियम, २०११ देण्यात आले आहे. हा अधिनियम जारी झाला असल्याने, विदेशी सहाय्य (विनियम) अधिनियम, १९७६ रद्दबातल झाला आहे. ह्यासाठी बँकांनी खात्री करुन घ्यावी की, ह्या नव्या अधिनियमाच्या तरतुदी व त्याखाली केलेले नियम ह्यांचे पूर्णपणे पालन केले जाईल. त्यानुसार, जनहितासाठी व असे करणे आवश्यक असल्याबाबत समाधान झाल्याने बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ (१९४९ चा १०) च्या कलम ३६ च्या उपकलम (१) च्या खंड (अ) ने तिला दिलेल्या अधिकारांचा आणि ह्या बाबतीत तिला असलेल्या सर्व अधिकारांचा वापर करुन, रिझर्व बँकेने, सर्व अनुसूचित वाणिज्य बँकांच्या (आरआरबी सोडून) अनुपालनासाठी, विदेशी सहाय्य (विनियम) अधिनियम, २०१० व विदेशी सहाय्य (विनियम) नियम, २०११ दिले आहे.

(१.२) ह्या नवीन अधिनियमाचे मुख्य गुणविशेष खाली दिले आहेत. ह्या अधिनियमाखाली व त्याखाली केलेल्या ह्या नियमांखाली, त्यांची कर्तव्ये/दायित्वे पूर्ण करण्यासाठी बँकांना एक मार्गदर्शक म्हणूनच हे महापरिपत्रक देण्यात येत आहे. ह्यात काही शंका आल्यास, बँकांनी ह्या अधिनियमातील मूळ मजकुराचा संदर्भ घ्यावा व तसेच आवश्यक वाटल्यास योग्य तो कायदेशीर सल्ला घ्यावा.

## (२) मार्गदर्शक तत्वे

(२.१) विदेशी सहाय्य (विनियम) अधिनियम, २०१० काही व्यक्तींच्या विशिष्ट वर्गांना विदेशी सहाय्य (कँाट्रिब्युशन) स्वीकारण्यास मनाई करतो. त्याचप्रमाणे तो, व्यक्तींच्या विशिष्ट वर्गांना, भारताबाहेरील कोणत्याही देशाला किंवा प्रदेशाला त्यांनी भेट दिल्यास, केंद्र सरकारच्या परवानगीशिवाय, विदेशातील आदरातिथ्य स्वीकारण्यास मनाई करतो. ह्या अधिनियमातील तरतुदींनुसार, निश्चित असे सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक कार्यक्रम असलेल्या व्यक्तींनी, कोणतेही विदेशी सहाय्य स्वीकारण्यापूर्वी, भारत सरकारकडे नोंदणी करुन घेतली पाहिजे. वरील वर्गात असलेल्या एखाद्या व्यक्तीने केंद्र सरकारकडे नोंदणी केलेली नसल्यास, ती व्यक्ती, केवळ केंद्र सरकारकडे नोंदणी केल्यानंतरच असे विदेशी सहाय्य स्वीकारु शकते. ह्याशिवाय, ह्या अधिनियमाखाली, केंद्र सरकारला, ह्या अधिनियमात विहित न केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला कोणतेही विदेशी सहाय्य स्वीकारण्यास मनाई करण्याचा अधिकार आहे किंवा त्यात विहित न केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला तिने विदेशी आदरातिथ्य स्वीकारण्यापूर्वी केंद्र सरकारकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.

(२.२) ह्या अधिनियमाने, विदेशी सहाय्य स्वीकारण्यासंबंधाने बँकांवर विशिष्ट दायित्वे टाकली आहेत. ह्या अधिनियमाच्या अटीनुसार, ह्या अधिनियमात दिल्यानुसार पंजीकरण प्रमाणपत्र/पूर्व परवानगी मिळविलेल्या व्यक्तीलाच केवळ एकाच खात्यात व त्या व्यक्तीने केलेल्या अर्जात विहित केलेल्या बँकेच्या शाखांद्वारेच विदेशी सहाय्य मिळविता येईल. अशा खात्यामधून अन्य कोणत्याही प्रकारचे निधी (विदेशी कँाट्रिब्युशन सोडून) मिळविणे/ठेवणे ह्यास सक्त मनाई आहे. ह्या अधिनियमानुसार प्रत्येक बँकेने किंवा विदेशी मुद्रेतील प्राधिकृत व्यक्तीने, विहित केलेल्या प्राधिकरणाला, विदेशी मुद्रेची विहित रक्कम, त्याचा स्त्रोत व कोणत्या रीतीने ते विदेशी प्रेषण केले गेले व इतर माहिती कळविणे अपरिहार्य आहे. ह्या अधिनियमाच्या कलम १८ नुसार, ह्या अधिनियमाखाली पंजीकरण प्रमाणपत्र किंवा पूर्व परवानगी मिळालेली आहे अशा प्रत्येक व्यक्ती त्यामध्ये विहित केलेली माहिती व रीत केंद्र सरकारला कळविणे आवश्यक आहे. अशा अहवालासोबत,

बँकेच्या एखाद्या अधिका-याने किंवा विदेशी मुद्रेतील प्राधिकृत अधिका-याने, मिळालेल्या विदेशी सहाय्याचा तपशील प्रमाणित करुन त्याचे विवरणपत्र जोडावे.

(२.३) विदेशी सहाय्य (विनियम) अधिनियम, १९७६ च्या कलम ६ खाली, पंजीकरण प्रमाणपत्र किंवा पूर्व परवानगी दिली गेली आहे, असे संघ, ह्या अधिनियमाखाली विदेशी सहाय्य मिळविण्यास पात्रच असतील आणि असे पंजीकरण, हा अधिनियम जारी होण्याच्या तारखेपासून पाच वर्षेपर्यंत वैध असेल. ह्या रद्द केलेल्या अधिनियमाच्या कलम ९ खाली विदेशी आदरातिथ्य मिळण्याबाबतची परवानगी, ती परवानगी केंद्र सरकारद्वारा काढून घेतली जाईपर्यंत, ह्याच अधिनियमाखाली दिली गेली असल्याचे समजले जाईल.

(२.४) विदेशी सहाय्य अधिनियम १९७६ खाली रिझर्व बँक, वेळोवेळी मार्गदर्शक तत्वे देऊन बँकांना सांगत आली आहे की, व्यक्तींच्या खात्यात जमा करण्यासाठी असे विदेशी सहाय्य स्वीकारण्यापूर्वी, संबंधित व्यक्ती/संस्था ह्यांनी त्यासाठी केंद्र सरकारकडे पंजीकरण केले आहे किंवा कायद्यानुसार असे विदेशी सहाय्य मिळण्यासाठी पूर्व परवानगी घेतलेली आहे तसेच केवळ विहित शाखा सोडून अन्य शाखा असे विदेशी सहाय्य स्वीकारत नाही ह्याची खात्री करुन घ्यावी. बँकांना असेही सांगण्यात आले होते की, त्यांनी अशी सहाय्ये मिळाल्याबाबतचा अहवाल केंद्र सरकारकडे पाठवावा. रद्द केलेल्या अधिनियमाबाबत, विहित केलेल्या कार्यरीतींमध्ये काही अनियमितता व उल्लंघन/विचलन दिसून आले होते. विदेशी सहाय्य मिळण्याबाबतच्या प्रकरणांमध्ये, बँका व वित्तसंस्थांनी ह्या नव्या अधिनियमाच्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

### (३) एफसीआरए, २०१० चे महत्वाचे गुणविशेष

### (३.१) प्रस्तावना

पूर्व पीठिकेवरुन स्पष्ट होते की, विदेशी सहाय्य (विनियम) अधिनियम, २०१० ह्याचा उद्देश म्हणजे, विशिष्ट व्यक्ती किंवा संघ किंवा कंपन्या ह्यांच्याद्वारे विदेश सहाय्य किंवा विदेशी आदरातिथ्याचा स्वीकार व उपयोग केला जाण्याबाबत विनियमित/नियंत्रित करणारा कायदा बळकट करणे, आणि राष्ट्रीय हितसंबंध व त्याच्याशी संबंधित बाबींना हानिकारक अशा कोणत्याही कार्यकृतींसाठी, विदेशी सहाय्य किंवा विदेशी आदरातिथ्य ह्यांना मनाई करणे. हा कायदा सर्व भारतात आणि भारताबाहेरील त्याचे रहिवासी ह्यांना लागु आहेच, तसेच, भारतामध्ये इनकॉर्पोरेट (सुसंस्थापित) झालेल्या किंवा नोंदणी झालेल्या कॉर्पोरेट, कंपन्या, ह्यांच्या भारताबाहेर असलेल्या शाखा व दुय्यम कंपन्यांनाही लागु आहे.

### (३.२) विदेशी सहाय्य स्वीकारण्यावरील मनाई

ह्या अधिनियमाच्या अटीनुसार काही विशिष्ट व्यक्तींना कोणतेही विदेशी सहाय्य स्वीकारण्यास संपूर्ण मनाई आहे. विदेशी सहाय्य (कँाट्रिब्युशन) ची व्याख्या, ह्या अधिनियमाच्या कलम (२) च्या खंड (ह) मध्ये दिलेली आहे ह्यांचा अर्थ, एखाद्या विदेशी स्रोताने दिलेली कोणत्याही वस्तूची देणगी, डिलिव्हरी किंवा हस्तांतरण.

(जिचे मूल्य विहित केलेल्या बाजारमूल्यापेक्षा नसलेली व वैय्यक्तिक उपयोगासाठी नसलेली भेटवस्तु) अशा वस्तूची, किंवा चलनाची (भारतीय किंवा विदेशी) किंवा प्रतिभूतीची, विदेशी स्त्रोताद्वारे दिलेली देणगी किंवा डिलिव्हरी किंवा हस्तातरण. विदेशी सहय्य (कॉंट्रिब्युशन) स्वीकारण्यास मनाई असलेल्या व्यक्ती पुढीलप्रमाणे आहेत

(अ) निवडणुकीचा उमेदवार
(ब) नोंदणीकृत वृत्तपत्राचा वार्ताहर, स्तंभलेखक, व्यंगचित्रकार, संपादक, मुद्रक किंवा प्रकाशक
(क) सरकारी मालकीच्या किंवा नियंत्रण असलेल्या कोणत्याही संस्थेचा न्यायाधीश, सरकारी नोकर किंवा कर्मचारी
(ड) कोणत्याही कायदेमंडळाचा सभासद

(ई) राजकीय पक्ष किंवा त्याचा सभासद
(फ) विहित केलेल्या, राजकीय स्वरुपाच्या संस्था
(ग) कोणत्याही प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक पध्दतीने किंवा प्रकाराने किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक प्रसार माध्यमाने, श्राव्य बातम्या किंवा दृक्-श्राव्य बातम्या किंवा चालु घडामोडीचे कर्यक्रम प्रक्षेपित/प्रसारित किंवा निर्माण करणारे संघ किंवा कंपन्या
(ह) वरील (ग) मध्ये संदर्भित असलेल्या संघाचा किंवा कंपनीचा वार्ताहर, स्तंभलेखक, व्यंगचित्रकार, संपादक किंवा मालक.

ह्या अधिनियमाने, केंद्र सरकारला, अधिकृत राजपत्राद्वारे, राजकीय स्वरुपाच्या संस्था म्हणून संस्थांना विहित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. तथापि पुढील काही विशिष्ट बाबतीत, वरील व्यक्तींना विदेशी सहाय्य स्वीकारण्याची परवानगी आहे

(अ) कोणत्याही विदेशी स्त्रोतामधून किंवा अशा विदेशी स्त्रोताद्वारे भारतात केल्या गेलेल्या सर्वसाधारण व्यवसायामध्ये केलेल्या प्रदानाद्वारे किंवा कोणत्याही विदेशी स्त्रोतामधून, त्या व्यक्तीला किंवा त्या व्यक्तीच्या हाताखाली काम करणा-या व्यक्तींच्या गटाला देणे असलेला पगार, वेतन, किंवा अन्य मानधन/मोबदला ह्या स्वरुपात

(ब) आंतरराष्ट्रीय व्यापार किंवा वाणिज्य ह्यामधील किंवा त्याने भारताबाहेर केलेल्या सर्वसाधारण व्यवहारामध्ये केलेल्या प्रदानाच्या स्वरुपात

(क) एखाद्या विदेशी स्त्रोताचा एजंट म्हणून किंवा अशा विदेशी स्त्रोताने केंद्र सरकार किंवा राज्य सरकार बरोबर केलेल्या कोणत्याही व्यवहारासंबंधाने

(ड) कोणत्याही भारतीय प्रतिनिधीमंडळाचा सदस्य म्हणून त्याला दिलेली भेट किंवा देणगी ह्या स्वरुपात - मात्र, अशी भेट किंवा देणगी ही, अशा भेटी किंवा देणगीबाबत भारत सरकारने तयार केलेल्या नियमांना अनुसरुन स्वीकारलेली/ठेवलेली असावी, किंवा

(ई) त्याच्या नातेवाईकाकडून किंवा

(फ) विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ खाली विदेशी मुद्रा संदर्भात प्राधिकृत असलेल्या एखाद्या व्यक्तीकडून किंवा अधिकृत वाहिनीद्वारा सर्वसाधारण व्यवसायामधून मिळालेल्या प्रेषणाच्या स्वरुपात किंवा

(ग) एखादी शिष्यवृत्ती, भत्ता किंवा त्या प्रकारच्या प्रदानाच्या स्वरुपात.

विदेशी सहाय्य (कॉंट्रिब्युशन) ह्या संज्ञेची व्याप्ती समजण्यासाठी, ह्या अधिनियमाने केलेली विदेशी स्त्रोत ची व्याख्या समजून घेणे आवश्यक आहे. ह्या संज्ञेच्या व्याख्येची व्याप्ती खूप मोठी आहे. सर्वसाधारणतः ह्यात, विदेशी सरकारे व त्यांच्या एजन्सी, कोणतीही आंतरराष्ट्रीय एजन्सी (युनायटेड नेशन्स, वर्ल्ड बॅंक इत्यादि विहित एजन्सी सोडून), विदेशी नागरिक, विदेशी कंपन्या व विदेशी कॉर्पोरेशन्स तसेच भारताबाहेर स्थापन झालेले किंवा नोंदणी झालेले युनियन्स, ट्रस्ट, सोसायट्या, क्लब्ज् इत्यादींचाही समावेश होतो.

## ३.३ विदेशी आदरातिथ्य स्वीकारण्यावरील निर्बंध

हा अधिनियम, काही विहित व्यक्तींद्वारे विदेशी आदरातिथ्याचा स्वीकार केला जाण्यावर निर्बंध घालतो. ह्यानुसार, विधिमंडळाचा कोणताही सदस्य किंवा राजकीय पक्षाचा कोणताही पदाधिकारी किंवा न्यायाधीश किंवा सरकारी नोकर किंवा सरकारच्या मालकीच्या किंवा तिच्या नियंत्रणाखालील कोणत्याही संस्थेचा किंवा कॉर्पोरेशनचा कर्मचारी, भारताबाहेरील

कोणत्याही देशाला किंवा प्रदेशाला त्याने दिलेल्या भेटीमध्ये, भारत सरकारची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय आदरातिथ्याचा स्वीकार करु शकणार नाही. तथापि, अशी परवानगी, कोणत्याही विदेशी भारताबाहेरील भेटीमध्ये एकाएकी झालेल्या आजारपणामुळे, आवश्यक असलेल्या तातडीच्या वैद्यकीय उपचारांना लागु होणार नाही. विदेशी आदरातिथ्य ह्या संज्ञेचा अर्थ, सर्वस्वी अनौपचारिक नसलेली रोख रकमेसंबंधाची किंवा तत्सम अशी, आणि विदेशातील कोणत्याही देशात किंवा प्रदेशात, प्रवासाचा खर्च, जेवण-निवास, वाहन किंवा वैद्यकीय उपचार निःशुल्क देणारी एखाद्या विदेशी स्त्रोताची ऑफर

**(३.४)** ह्याशिवाय, ह्या अधिनियमात विहित न केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेत कोणतेही विदेशी स्वीकारण्यास मनाई करण्याचा, तसेच ह्या अधिनियमात विहित न केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला, विदेशी आतिथ्य स्वीकारण्याबाबत केंद्र सरकारची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असल्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे.

### (३.५) विदेशी कॉंट्रिब्युशन स्वीकारण्यासाठी नोंदणी

ह्या अधिनियमाच्या कलम ११ अन्वये, ह्या अधिनियमात अन्यथा केलेली तरतुद सोडल्यास, केंद्र सरकारकडून नोंदणी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय, एखादा निश्चित सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक किंवा सामाजिक कार्यक्रम असलेली कोणतीही व्यक्ती विदेशी अतिथ्याचा स्वीकार करु शकणार नाही. वरील वर्गात असणारी व्यक्ती, केंद्र सरकारकडे नोंदणीकृत झालेली नसल्यास, ती व्यक्ती, केवळ केंद्र सरकारची पूर्व परवानगी मिळाल्यावरच विदेशी कॉंट्रिब्युशन स्वीकारु शकते. अधिकृत राजपत्रात अधिसूचना देऊन, केंद्र सरकार, विदेशी कॉंट्रिब्युशन स्वीकारण्यापूर्वी, सरकारची पूर्वपरवानगी मिळविण्यास पात्र अशी व्यक्ती, किंवा व्यक्तींचा वर्ग ज्यामध्ये असे सहाय्य मिळविता येऊ शकते अशी क्षेत्रे, ज्यासाठी अशा सहाय्याचा उपयोग केला जाईल असे हेतु/उद्दिष्टे, आणि असे विदेशी कॉंट्रिब्युशन ज्यामधून दिले जाते असे स्त्रोत, विहित केले जातील. अशा रितीने दिलेले पंजीकरण/नोंदणी प्रलंबित किंवा रद्द करण्याचा अधिकारही केंद्र सरकारला आहे. कलम १२ खाली पंजीकरण प्रमाणपत्र दिली गेलेली व्यक्ती, त्या प्रमाणपत्राची वैधता संपण्याच्या सहा महिने आधीच त्या प्रमाणपत्राचे नूतनीकरण करील.

### ३.६ विदेशी सहाय्याचा स्वीकार, हस्तांतरण व उपयोग इत्यादींवरील मनाई व निर्बंध

**३.६.१** नोंदणीकृत झालेल्या व प्रमाणपत्र दिल्या गेलेल्या किंवा ह्या अधिनियमाखाली पूर्व-परवानगी मिळविलेल्या व्यक्तींवर, ह्या अधिनियमानुसार असे कॉंट्रिब्युशन अन्य कोणत्याही व्यक्तीला, (ती व्यक्ती नोंदणीकृत नसल्यास किंवा तिने ह्या अधिनियमाखाली तिने पूर्वपरवानगी मिळविली नसल्यास) हस्तांतरित करण्यास मनाई घालण्यात आली आहे. मिळालेल्या अशा विदेशी कॉंट्रिब्युशनच्या उपयोगाबाबत काही निर्बंध घालण्यात आले आहेत आणि ह्या अधिनियमानुसार, ज्या उद्देशासाठी ते सहाय्य मिळविले होते त्याच उद्देशासाठी त्याचा उपयोग केला जाणे बंधनकारक आहे. कोणतेही विदेशी कॉंट्रिब्युशन किंवा त्यामधून निर्माण झालेल्या उत्पन्नाचा सट्टेबाजी करण्यासाठी उपयोग केला जाऊ शकणार नाही. प्रशासकीय खर्चासाठी विदेशी कॉंट्रिब्युशन वापरण्यावर ह्या अधिनियमाद्वारे निर्बंध घालण्यात आला आहे.

**३.६.२** ह्या अधिनियमाद्वारे, कलम ३ मध्ये विहित न केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला कोणतेही विदेशी सहाय्य स्वीकारण्यास मनाई करण्याचा आणि कलम ६ मध्ये विहित न केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तीवर्गाला, केंद्र सरकारची पूर्व परवानगी घेण्यापूर्वी विदेशी आतिथ्य स्वीकारण्यास मनाई करण्याचा अधिकार केंद्र सरकारला देण्यात आला आहे. योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, एखाद्या व्यक्तीजवळ किंवा त्याच्या नियंत्रणाखाली, ह्या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन होईल अशी त्याने स्वीकारलेली वस्तु किंवा चलन किंवा प्रतिभूती (भारतीय किंवा विदेशी) असल्याबाबत केंद्र सरकारचे समाधान झाल्यास, केंद्र सरकार, लिखित आदेश देऊन, त्या व्यक्तीला, अशा वस्तु, चलन, प्रतिभूतीबाबत कोणत्याही रितीने प्रदान करणे, देणे, हस्तांतरण किंवा अन्य बाबतीत, (केंद्र सरकारकडून अन्यथा दिल्या गेलेल्या लेखी आदेश मिळाल्याशिवाय) मनाई घालू शकते.

### ३.७ अनुसूचित बँकेमार्फत मिळविले जाणारे विदेशी काँट्रिब्युशन

ह्या अधिनियमाचे कलम १७, बँकर्ससाठी विशेष महत्वाचे आहे. त्या कलमानुसार, जिला प्रमाणपत्र मिळाले आहे किंवा कलम १२ खाली पूर्वपरवानगी मिळालेली प्रत्येक व्यक्ती, तिने प्रमाणपत्र मिळविण्यासाठीच्या अर्जात, ज्या बँक शाखेचे नाव विहित केले होते, त्याच बँक शाखेमधील केवळ एकाच/त्याच खात्यामध्ये विदेशी सहाय्य स्वीकारु शकेल. अशी व्यक्ती, त्याला मिळालेल्या विदेशी सहाय्याचा उपयोग करण्यासाठी, एका किंवा अधिक बँकांमध्ये एक किंवा अधिक खाती उघडू शकेल. तथापि, अशा खात्यामध्ये किंवा खात्यांमध्ये, केवळ त्याला मिळालेले किंवा त्याने ठेवलेले विदेशी सहाय्य सोडून अन्य कोणताही निधी जमा करता येणार नाही. ह्या अधिनियमानुसार वैधानिक करण्यात आले आहे की, प्रत्येक बँक किंवा विदेशीमधील प्राधिकृत व्यक्ती, विहित केलेल्या प्राधिकरणाला विहित स्वरुपात पुढील गोष्टी कळवील (अ) विदेशी सहाय्याची विहित रक्कम (ब) त्या विदेशी सहाय्याचा स्त्रोत आणि मिळण्याची रीत आणि (क) इतर तपशील. प्रमाणपत्र मिळालेल्या व ह्या अधिनियमाखाली पूर्व परवानगी मिळालेल्या प्रत्येक व्यक्तीला, विहित केलेल्या रीतीने व कालावधीत, केंद्र सरकारला किंवा त्याने विहित केलेल्या अन्य प्राधिकरणाला त्याला मिळालेल्या प्रत्येक विदेशी सहाय्याची रक्कम व स्त्रोत मिळण्याची रीत, तसेच ज्यासाठी ते मिळविण्यात आले त्याचा हेतु व त्याने त्या सहांय्याच्या केलेल्या उपयोगाचा प्रकार ह्याबाबत कळविणे आवश्यक आहे. ह्याशिवाय, विदेशी सहाय्य मिळालेल्या प्रत्येक व्यक्तीने, मिळालेल्या विदेशी सहाय्याचा तपशील असलेले, व बँकेचा अधिकारी किंवा विदेशी मुद्रेतील प्राधिकृत अधिकारी ह्यांनी प्रमाणित केलेले विवरणपत्र तयार करुन ते केंद्र सरकारला सादर करणे आवश्यक आहे.

### ३.८ लेखा ठेवणे व ॲसेट्सची वासलात

ह्या अधिनियमाच्या कलम १९ अनुसार, प्रमाणपत्र मिळालेल्या किंवा पूर्व परवानगी मिळालेल्या प्रत्येक व्यक्तीने, तिला मिळालेल्या विदेशी मुद्रेबाबत, स्वीकार व उपयोग ह्यांची लेखा विहित स्वरुपात ठेव आवश्यक/वैधानिक आहे. ह्या अधिनियमाखाली विदेशी सहाय्य मिळविण्याची परवानगी मिळाली आहे अशी व्यक्ती मृत झाल्यास किंवा बाद झाल्यास, अशा व्यक्तीच्या सर्व मालमत्तेची ती व्यक्ती, जारी असलेल्या ज्या कायद्याखाली पंजीकृत झाली होती त्या कायद्याच्या तरतुदीनुसार वासलात लावण्यात यावी.

### ३.९ तपासणी व जप्त करण्याचे अधिकार

ह्या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन झाले आहे काय हे तपासण्यासाठी लेखा किंवा रेकॉर्ड्सची तपासणी करण्यासाठी प्राधिकृत देण्याचा अधिकार ह्या अधिनियमाने केंद्र सरकारला दिला आहे.

### ३.१० संकीर्ण प्रश्न

ह्या अधिनियमामध्ये काही विशिष्ट गुन्हे व तिच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दलची शिक्षा/दंड दिलेला आहे. ह्या अधिनियमाच्या कलम ३७ अनुसार, वेगळा विशिष्ट दंड विहित न केलेल्या, ह्या अधिनियमाच्या एखाद्या तरतुदीचे पालन कोणाहीकडून न केले गेल्यास त्याला एक वर्षापर्यंतचा तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्हीही अशी शिक्षा केली जाईल.

ह्या अधिनियमानुसार, ह्या अधिनियमाखाली दंडनीय असलेल्या कोणत्याही गुन्ह्यासाठी (मग तो व्यक्तीने केलेला असो किंवा संघाने किंवा त्याच्या अधिका-याने किंवा कर्मचा-याने), तो केवळ तुरुंगवासापुरताच दंडनीय नसलेला गुन्हा नसल्यास, असा दंड अंमलात आणण्यापूर्वी, केंद्र सरकारने त्याच्या अधिकृत राजपत्रात दिलेल्या अधिसूचनेनुसार विशिष्ट अधिकारी व केंद्र सरकारने ठरविलेल्या रकमांसाठी त्याचे कंपाऊंडिंग केले जाऊ शकते.

ह्या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याबाबत, केंद्र सरकार, तिला योग्य वाटतील असे निदेश कोणत्याही प्राधिकरणाला किंवा व्यक्ती वर्गाला देऊ शकते.

**४ ह्या अधिनियमाखाली केलेले नियम व बँकांद्वारे अहवाल पाठविणे जाणे**

**४.१** ह्या अधिनियमाच्या कलम ४८ ने दिलेल्या अधिकारांचा वापर करुन, ह्या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी, केंद्र सरकारने, विदेशी सहाय्य (विनियम) नियम, २०११ तयार केले आहेत. ह्या नियमांमध्ये, इतर बाबींसह, केंद्र सरकारसाठी पुढील बाबतीत निर्णय घेण्यासाठी/ठरविण्यासाठी मार्गदर्शक तत्वे दिली आहेत एखादी संस्था राजकीय स्वरुपाची आहे काय, सट्टेबाजीच्या (स्पेक्युलेटिव) समजल्या जाव्यात अशा कार्यकृतींचे स्वरुप, प्रशासकीय खर्च म्हणजे काय, विहित/विशिष्ट व्यक्तीवर्गाद्वारे विदेशी आतिथ्य मिळविण्याबाबतच्या कार्यरीती, विदेशी सहाय्य मिळविण्यासाठी, नोंदणी किंवा पूर्वपरवानगी मिळविण्यासाठीच्या अर्जाबाबतची कार्यरीती कंपाऊंडिंगसाठी कुणाकडे अर्ज करावा. नोंदणीकृत किंवा अ-नोंदणीकृत व्यक्तींना विदेशी सहाय्य हस्तांतरित करण्यासाठीची कार्यरीत, निरनिराळ्या उद्देशांसाठी वापरावयासाठी फॉर्म्स, इत्यादि

**४.२** ह्या नियमांच्या नियम १३ अनुसार, पंजीकरण प्रमाणपत्र मिळालेल्या किंवा पूर्व परवानगी मिळविलेल्या एखाद्या व्यक्तीला, रु. १ कोटी पेक्षा अधिक किंवा त्याच्या सममूल्य विदेशी सहाय्य एका आर्थिक वर्षात मिळाले असल्यास, त्या व्यक्तीने, मिळालेली सहाय्ये व त्याचा उपयोग ह्यांची स्वीकाराचे वर्ष व त्यानंतरचे वर्ष ह्यासाठी असलेली सारांशरुपरेषा असलेल्या माहितीला सार्वजनिक प्रसिध्दी द्यावी.

**४.३** हे समजणे महत्वाचे आहे की, नियम १५ च्या अटीनुसार, ज्याचे पंजीकरण प्रमाणपत्र रद्द झाले आहे अशा व्यक्तीच्या खास असलेल्या विदेशी सहाय्य बँक खात्यात वापर न झाल्याने तशीच पडून राहिलेली विदेशी सहाय्याची रक्कम ही, केंद्र सरकार ह्याबाबत पुढील निदेश देईपर्यंत, संबंधित बँकिंग प्राधिकरणाच्याच ताब्यात राहील. ज्याचे पंजीकरण प्रमाणपत्र रद्द झाले अशा व्यक्तीने ते विदेशी सहाय्य अन्य एखाद्या व्यक्तीला हस्तांतरित केल्यास/केले असल्यास, ज्याला तो निधी हस्तांतरित झाला आहे त्या व्यक्तीलाही ही अट लागु होईल.

**४.४** ह्या नियमांच्या नियम १६ अनुसार, ज्याला पंजीकरण प्रमाणपत्र घेणे किंवा ह्या अधिनियमाखाली पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे, परंतु त्याला असे प्रमाणपत्र अथवा पूर्व परवानगी प्रेषणाच्या तारखेस दिली गेली नाही अशा बाबतीत, त्या विदेशी सहाय्याबाबतच्या कोणत्याही व्यवहाराच्या तीस दिवसांच्या आत, प्रत्येक बँकेने, त्याबाबतचा रिपोर्ट केंद्र सरकारकडे सादर करणे आवश्यक आहे. अशा अहवालामध्ये पुढील गोष्टी असाव्यात.

(अ) दात्याचे नाव व पत्ता
(ब) स्वीकारकर्त्याचे नाव व पत्ता
(क) खाते क्रमांक
(ड) बँकेचे व शाखेचे नाव
(ई) विदेशी सहाय्याची रक्कम (विदेशी चलनात व भारतीय रुपयात)
(फ) मिळाल्याची तारीख
(ग) विदेशी सहाय्य मिळण्याची रीत

**४.५** संबंधित बँकेचे कर्तव्य ठरविण्यात आले आहे की, त्या बँकेने, एक कोटी रुपयांपेक्षा अधिक किंवा त्याच्या सममूल्य व एकरकमी रकमेबाबतच्या शेवटच्या व्यवहाराच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत किंवा पंजीकरण झाले असो किंवा नसो, एखाद्या व्यक्तीने केलेल्या व्यवहारांच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत केंद्र सरकारकडे त्याचा अहवाल पाठवावा आणि अशा अहवालात वरील तपशील समाविष्ट असावा.

---------

**जोडपत्र १**

**ह्या महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या, एफसीआरए, २०१० वरील परिपत्रकांची यादी**

| अनुक्रमांक | परिपत्रक क्र. व दिनांक | विषय | सूचनांचा सारांश |
|---|---|---|---|
| १ | डीबीओडी.एएमएल.बीसी.क्र.८०/१४.०८.००१/२०११-१२ दि. फेब्रुवारी ०६, २०१२ | बीआर अधिनियम, १९४९ च्या कलम १६(१)(अ) खाली दिलेली मार्गदर्शक तत्वे एफसीआरए, २०१० च्या तरतुदीची अंमलबजावणी | एफआरआरए, २०१० व एफसीआर नियम २०११ चे मुख्य गुणविशेष व ह्या अधिनियमाखाली बँकांची दायित्वे. |